CMYK

# भारताच्या प्रतिहल्ल्यामुळे संपूर्ण पाकिस्तान हादरला

लबाडांनो, पाणी द्या या आंदोलनाने लाखो नागरिकांपर्यंत पोहोचत पाणी समस्येवर ठोस उपाययोजना करण्याची मागणी >> पान 2

पाचोऱ्यातील फौजी जवान लग्नाच्या बोहल्यावरुन उतरताच देशाच्या सिमेवर रवाना >> पान 3

देशवासीयांची एकजूट, राजकीय इच्छाशक्ती आणि सैन्य दलाने केलेल्या गगनभेदी कारवाईतुन ‘‘ऑपरेशन सिंदुर’’ यशस्वी : केंद्रीय मंत्री जाधव >> पान 4

**सुविचार**

दुसऱ्यांना प्रेरित करा, हेच खरे यश आहे.

दैनिक
# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com  मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 264 ■ शुक्रवार, दि. 09 मे 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



एमबीबीएसचं शिक्षण पूर्ण करुन सिनेक्षेत्रात, टॉलिवूडमध्ये मोठं यश

आतील पान

# भारताचे पाकिस्तानवर दहा मोठे हल्ले



नवी दिल्ली : पाकिस्तानच्या दहशतवादी तळांवर हल्ला करुन ती उद्ध्वस्त केल्यानतंर ऑपरेशन सिंदूर हे सुरूच राहणार असल्याचं भारताने त्याच्या कृतीतून स्पष्ट केलं आहे. भारताने आता लाहोर, कराचीपर्यंत जाऊन ड्रोनच्या माध्यमातून पाकिस्तानची रडार यंत्रणा उद्ध्वस्त केल्याचं समोर आलं आहे. त्यामुळे भारतीय विमाने आता पाकिस्तानच्या हद्दीत घुसून कारवाई करतील आणि ते पाकिस्तान ट्रॅक करु शकणार नाही. याचसोबत पाकिस्तानच्य विविध ठिकाणी बॉम्ब स्फोट होत असून त्यामुळे संपूर्ण पाकिस्तामध्ये गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली आहे.

सिंदूर ऑपरेशनमध्ये भारताने आधी पाकिस्तानच्या ९ दहशतवादी ठिकाणांवर हल्ला केला. त्यानंतर ही कारवाई सुरुच असून पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद आता मुळासकट संपवण्यावर भारताचा भर आहे. भारतीय वायुदलाला यासाठी सरकारने खास सूट दिली असून पाकिस्तानी विमानं आकाशात दिसल्यास तोडीस तोड उत्तर देण्याचे निर्देश दिले आहेत.

भारतानं पाकिस्तानच्या ९ शहरांत ड्रोन हल्ले केल्याची माहिती समोर आली आहे. लाहोर, रावळपिंडी, कराचीमध्ये ड्रोन हल्ला झाल्याचं पाकिस्तानचं म्हणणं आहे. लाहोरमधल्या लष्करी तळावर भारतानं हल्ला केल्याचा दावा करण्यात आला.

गुजरानवाला आणि अटक शहरांवरही भारताचे ड्रोन हल्ले झालेत असा पाकिस्तानचा दावा आहे. भारताचे १२ ड्रोन पाडल्याचा पोकळ दावाही पाकिस्ताननं यावेळी केला. पाकिस्तानमधली मोठमोठी शहरं ड्रोन हल्लयानं हादरली आहेत. पाकिस्तानच्या आयएसपीआरचे महासंचालक ले.जन.अहमद शरीफ यांनी हा दावा केला.

भारताने पाकिस्तानची क्ट-९ हवाई संरक्षण यंत्रणा उद्ध्वस्त केली आहे. भारताचे हवाई हल्ले रोखण्यासाठी ही यंत्रणा चीनकडून आयाय करण्यात आली होती. एकाचवेळी १०० टार्गेट ट्रॅक करुन ते उद्ध्वस्त करण्याची क्षमता या यंत्रणेची होती, हीच यंत्रणा भारताने उद्ध्वस्त केली.

पाकिस्तानातील लाहोरमध्ये स्फोट झाल्याची माहिती समोर आली आहे. लाहोरमधील वॉल्टन एअर फिल्ड परिसरात हा स्फोट झाला. या स्फोटानंतर लाहोरमध्ये गोंधळाची स्थिती निर्माण झाली असून शहरभर सायरनही वाजवण्यात आला.

लाहोरमध्ये 'नोटीस टू एअर मिशन' जारी करण्यात आलं आहे. त्याचसोबत सीमेवर पाकिस्तानकडून युद्धसामग्री आणि रणगाडेही तैनात करण्यात आले आहेत.

पाकिस्तानच्या बलुचिस्तान प्रांतातील बोलन पास परिसरात खएऊ स्फोटात १२ पाकिस्तानी सैनिकांचा मृत्यू झाला आहे. बलुच लिबरेशन आर्मीने या हल्लयाची जबाबदारी घेतली आहे.

भारतीय वायुदलाने रात्री ड-४०० एअर डिफेन्स सिस्टीम डागली. भारतीय हद्दीकडे येणारी टार्गेट्स एस ४०० ने उडवल्याची माहिती एएनआय वृत्तसंस्थेने दिली आहे.

भारताच्या १५ शहरांवर पाकिस्तानचा हल्लयाचा प्रयत्न झाला. पण हा हल्ला निकामी करत पाकिस्तानचा प्रयत्न भारताने उधळल्याची माहिती लष्कराने दिली. भारतातील अमृतसर,अवंतीपुरा, श्रीनगर, जम्मू, पठाणकोटमध्ये हल्लयाचा प्रयत्न झाला. तसेच जालंधर, भूज, आदमपूर, बठिंबा, लुधियानावर हल्लयाचा प्रयत्न झालाअमृतसरजवळच्या जेठुवाल गावात रात्री पाकिस्तानी रॉकेट पाडण्यात आलं. भारतीय सैन्याने त्या रॉकेटचे अवशेष ताब्यात घेतले.

## पाकिस्तानच्या १२ सैनिकांचा खात्मा

### बलूच विद्रोह्यांनी सैन्याची गाडी रिमोटने उडवली



नवी दिल्ली : काश्मीरच्या पहलगाम येथील दहशतवादी हल्लयानंतर भारत नक्कीच मोठी कारवाई करेल याची शक्यता जवळ जवळ साऱ्यांना होती. किंबहुना तमात भारतीयांची तशी ती अपेक्षा अन् तीव्र इच्छा देखील होती. अखेर मंगळवारच्या मध्यरात्रीच्या सुमारास व्हायचं तेच झालं.भारतीय सैन्याने पाकव्याप्त काश्मीरमधील ९ दहशतवादी तळांवर एअर स्ट्राईक करत ऑपरेशन सिंदूर ही मोहीम फत्ते केली आहे. एकाएक झालेल्या या हल्यात पीओकेमधील ९ ठिकाणी क्षेपणास्त्रांचा मारा करुन दहशतवादी तळ बेचिराख करण्यात आले. अवघ्या २५ मिनिटांत भारतीय वायूदलाने ही सगळी कामगिरी पार पाडत पाकिस्तानी सैन्याला चपराक लगावली.

दरम्यान, या कृत्याचे देशभरात कौतुक झालं आणि अनेक देशांनी या कारवाईचे समर्थन करत भारताला पाठिंबा दर्शवला. त्यामुळे आता पाकिस्तान पुरता कोंडीत सापडला असताना पाकिस्तानवर आणखीन एक मोठा आघात झाल्याची माहिती समोर आली आहे. बलुचिस्तानमध्ये बलूच विद्रोह्यांनी पाकिस्तानी सैन्यावर >> पान २

## जम्मू, पठाणकोट, जैसलमेर, होशियारपूरवर पाकिस्तानचा ड्रोन हल्ला

### भारताचाही प्रतिहल्ला, थेट लाहोरवर हल्लाबोल

नवी दिल्ली : ऑपरेशन सिंदूरमुळे बिथरलेल्या पाकिस्तानने आगळीक केली असून त्याने भारतावर ड्रोन हल्ले केले. जम्मू, पठाणकोट, जैसलमेर, पंजाबमधील होशियारपूरवर पाकिस्तानने ड्रोन हल्ला केला. पाकिस्तानच्या हल्ल्यानंतर या ठिकाणी ब्लॅकआऊट करण्यात आलं असून भारताची डिफेन्स सिस्टिम सक्रिय झाली आहे. भारताने



पाकिस्तानचे अनेक ड्रोन पाडल्याची माहिती समोर आली आहे. जम्मूतील विमानतळ हे पाकिस्तानचे लक्ष्य होतं अशी माहिती समोर येत आहे. पाकिस्तानच्या या हल्ल्याला भारताने लागोलाग उत्तर दिलं असून थेट लाहोरवर ड्रोन हल्ला केला आहे.

गुरुवारी रात्रीच्या वेळी भारताच्या हद्दीतील जम्मू शहरात पाकिस्तानच्या ड्रोनचा हल्ला सुरू झाला. त्यानंतर जम्मूमध्ये >> पान २

## भारताचा डबल धमाका, आता थेट लाहोरमध्ये ड्रोन घुसवले, पाकिस्तानचा दावा

नवी दिल्ली : भारताच्या ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्तानमधील मोठमोठी शहरं ड्रोन हल्लयानं हादरल्याची पाहायला मिळत आहे. भारताने पाकिस्तानमधील ९ शहरांत ड्रोन हल्ले केल्याचा पाकिस्तानने दावा केला आहे. लाहोर, रावळपिंडी, कराचीमध्ये भारताकडून ड्रोन हल्ले करण्यात आले असा दावा पाकिस्तानकडून करण्यात आला आहे. लाहोरमधल्या लष्करी तळावर भारतानं हल्ला केल्याचंही पाकिस्तानने म्हटलं आहे.

भारताने पाकिस्तानमधील ९ शहरांत ड्रोन हल्ले केले आहे. लाहोर, रावळपिंडी,कराची या शहारांत भारताकडून ड्रोन हल्ले करण्यात आले आहे. लाहोरमधल्या लष्करी तळावर भारतानं हल्ला केल्याचा पाकिस्तानने दावा केलाय.

## 'ऑपरेशन सिंदूर'नंतर महाराष्ट्रभरात अलर्ट

मुंबई : जम्मू-काश्मीरमधील पहलगाममध्ये झालेल्या भ्याड दहशतवादी हल्लयात निष्पाप २६ जणांचा दुदैवी मृत्यू झाला. या घटनेनंतर देशासह जगभरात संतापाची लाट परसाली होती. परिणामी या भ्याड हल्याला जशाच तसं उत्तर देत भारताने १५ दिवसानंतर बदला घेत पाकड्यांना अद्दल घडवली आहे. भारताने 'ऑपरेशन सिंदूर'च्या माध्यमातून पाकिस्तानच्या ९ दहशतवादी तळांवर एअर स्ट्राइक करत पहलगामच्या भ्याड हल्लयाला चोख प्रत्युत्तर देत बदला घेतलाय. या घटनेने पाकिस्तान पुरता घाबरल्याचे दिसून येत आहे. शिवाय पाकिस्तानकडून सीमारेषेवर वारंवार गोळीबार करण्यात येत आहे. अशातच पाकिस्ताननं परत एकदा आपला खरा चेहरा समोर करत अमृतसरजवळच्या जेठुवाल गावात पाकिस्तानी रॉकेट पाडण्यात आलं आहे. तर दुसरीकडे महाराष्ट्रासह देशातील अनेक भागात सुरक्षा व्यवस्थेत वाढ करण्यात आली आहे. पाकिस्तानमधील हवाई हल्लयानंतर महाराष्ट्रात अलर्ट जारी करण्यात आला आहे. महाराष्ट्रातील महत्त्वाच्या पर्यटन स्थळांची, आध्यात्मिक स्थळांची सुरक्षा वाढवण्यात आली आहे.

# एअरफोर्सला सरकारचा फ्री-हँड



## ऑपरेशन सिंदूर नंतर भारतीय सैन्य पाकिस्तानला पुन्हा दणका देणार

नवी दिल्ली : भारतीय सैन्याने मंगळवारी मध्यरात्रीच्या सुमारास पाकव्याप्त काश्मीरमधील नऊ दहशतवादी तळ हवेतून क्षेपणास्त्रं डागून बेचिराख केले होते. भारताच्या 'ऑपरेशन सिंदूर'मुळे पाकिस्तानी सैन्याला मोठा झटका बसला होता. भारताच्या या एअर स्ट्राईकनंतर पाकिस्तान खडबडून जागा झाला होता. पाकिस्तानी सैन्याने सीमेवर सैन्याची आणि युद्धसामुग्रीची जमवाजमव सुरु केली आहे. या पार्श्र्वभूमीवर भारतीय वायू दलाला केंद्र सरकारने खुली सूट दिली आहे. पाकिस्तानने आगळीक केल्यास तोडीस तोड उत्तर देण्याची मुभा एअरफोर्सला देण्यात आली आहे.

पाकिस्तानची लढाऊ विमाने भारतीय हद्दीत शिरली तर त्यांना योग्य ते प्रत्युत्तर देण्याचे सर्वाधिकार वायदूलाला देण्यात आले आहेत.

ऑपरेशन सिंदूर नंतर दिल्लीतील घडामोडींना वेग आला आहे. दिल्लीत आज संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या नेतृत्त्वाखाली सर्वपक्षीय बैठक होत आहे. तर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल हे परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवून आहेत. सर्वपक्षीय बैठकीनंतर भारत पाकिस्तानविरुद्ध आणखी एखादी निर्णायक कारवाई करणार का, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

ऑपरेशन सिंदूर नंतर पाकिस्तानकडून हवाई >> पान २



CMYK

## आधुनिक भगीरथ : कर्मवीर भाऊराव पाटील

बहुजन समाजापर्यंत शिक्षणाची गंगा पोहचवणारे आधुनिक काळातील भगीरथ रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांची आज पुण्यतिथी. कर्मवीर भाऊराव पाटील यांचा जन्म कोल्हापूर जिल्ह्यातील कुंभोज या गावी २२ सप्टेंबर १८८७ रोजी झाला. सांगली जिल्ह्यातील ऐतवडे हे त्यांचे मूळ गाव होय. कर्मवीर भाऊराव पाटील हे लहानपणापासूनच बंडखोर प्रवृत्तीचे होते. तत्कालीन जातीव्यवस्थेत उच्च जातींकडून कनिष्ठ जातींवर होणाऱ्या अन्यायाची त्यांना खूप चीड होती. अस्पृश्यतेबद्दल त्यांच्या मनात प्रचंड राग होता. अस्पृश्य समाजाला उच्च वर्णीयांकडून जी वागणूक दिली जात होती त्याबाबत त्यांच्यामनात प्रचंड असंतोष होता. अस्पृश्य समाजाला विहिरीचे पाणी दिले जात नाही हे पाहून त्यांनी विहिरीचे रहाटच तोडून टाकले होते. कर्मवीर भाऊराव पाटलांना शिक्षणाची खूप आवड होती. त्यांचे प्राथमिक शिक्षण कोल्हापूर जिल्ह्यातील विटा या गावी झाले तर माध्यमिक शिक्षण कोल्हापूरच्या राजाराम हायस्कूलमध्ये झाले. शालेय वयातच त्यांच्यावर छत्रपती शाहू महाराजांच्या विचारांचा प्रभाव पडला. छत्रपती शाहू महाराज व महात्मा ज्योतिराव फुले यांना ते आदर्श मानू लागले. शिक्षण पूर्ण झाल्यावर ते साताऱ्यात गेले तीथे त्यांनी गरीब मुलांसाठी शिकवण्या सुरू केल्या. याच काळात त्यांनी मद्दना मास्तर, भाऊसाहेब कुदळे, नानासाहेब येडेकर यांच्या मदतीने दुधगावत दुधगाव शिक्षण मंडळाची स्थापना केली. या संस्थेमार्फत गरीब मुलांसाठी एक वसतिगृह सुरू केले. ४ ऑक्टोबर १९१९ रोजी कर्मवीरांनी सातारा जिल्ह्यातील काले गावात रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. बहुजन समाजातील मुलांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण करून त्यांना मोफत व दर्जेदार शिक्षण देणे हे रयत शिक्षण संस्थेचे मुख्य उद्दिष्ट होते. बहुजन समाजातील गरीब मुलांना दर्जे दार शिक्षण मिळावे यासाठी त्यांनी अपार कष्ट घेतले. बहुजन समाजातील मुलांना केवळ पुस्तकी शिक्षण न देता त्यांनी त्यांना समता, बंधुता, श्रमप्रतिष्ठा, सामाजिक बांधिलकी आदी मूल्यांची देखील शिकवण दिली. संस्थेत शिक्षण घेणाऱ्या मुलांना साताऱ्यात राहण्याची सोय व्हावी म्हणून त्यांनी वसतिगृह बांधले. या वसतिगृहाची जबाबदारी त्यांनी पत्नी लक्ष्मीबाई यांच्यावर सोपवली. लक्ष्मीबाई या वसतिगृहातील मुलांसाठी मायेची सावली बनल्या. वसतिगृह चालवण्यासाठी त्यांना आपले दागिने विकावे लागले. अतिशय प्रतिकूल परिस्थितीत संस्था आणि वसतिगृह चालवण्याचा प्रयोग कर्मवीरांना करता आला तो लक्ष्मीबाई यांच्यामुळेच. कर्मवीरांनी रयत शिक्षण संस्थेत कमवा आणि शिका योजना सुरू केली. या योजनेनुसार चालणारे पहिले फ्री अँड रेसिडेंशल हायस्कूल सातारा येथे सुरू करून त्या हायस्कूलला महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे नाव दिले. त्यानंतर याच नावाने त्यांनी अनेक शाळा काढल्या. १९४७ साली कर्मवीरांनी साताऱ्यात छत्रपती शिवाजी कॉलेज, तर १९५४ साली कराड येथे सदगुरु गाडगे महाराज कॉलेजची स्थापना केली. आपल्या संस्थेत प्रशिक्षित शिक्षकांचा वानवा पडू नये यासाठी त्यांनी अध्यापक विद्यालये देखील सुरू केली. भाऊराव पाटील यांच्या हयातीत रयत शिक्षण संस्थेने ५७८ प्राथमिक शाळा, ४३९ माध्यमिक शाळा, ( २७ मुलींसाठी ) ३८ वसतिगृह शाळा, १६० उच्च माध्यमिक विद्यालये, २१ तंत्रदान विद्यालये, ८ अध्यापक विद्यालये, ( १ मुलींसाठी ) ४१ महाविद्यालये (४ मुलींसाठी ) आणि ५ इंग्रजी माध्यमांची विद्यालये यांची स्थापना केली. रयत शिक्षण संस्थेचा विस्तार महाराष्ट्रातच नाही तर कर्नाटकातही झालेला आहे. त्यांनी लावलेल्या रयत शिक्षण संस्थेचा आज वटवृक्ष बनला आहे. बहुजन वर्गातील मुलांसाठी त्यांनी केलेले कार्य पाहून पुणे विद्यापीठाने १९५९ साली त्यांना डि. लीट ही मानाची पदवी बहाल केली. भारत सरकारनेही पद्मभूषण हा मानाचा पुरस्कार देऊन त्यांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव केला. बहुजन समाजापर्यंत शिक्षणाची गंगा पोहचवणाऱ्या या आधुनिक भगिरथाचे ९ मे १९५९ रोजी निधन झाले. आज त्यांची पुण्यतिथी. आजच्या दिवशी त्यांचे स्मरण करून त्यांना अभिवादन करणे हे बहुजनांचे आद्य कर्तव्य आहे. कर्मवीर भाऊराव पाटलांना विनम्र अभिवादन!

# लबाडांनो, पाणी द्या या आंदोलनाने लाखो नागरिकांपर्यंत पोहोचत पाणी समस्येवर ठोस उपाययोजना करण्याची मागणी

## विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांची पत्रकार परिषदेत माहिती

**दैनिक आपला विदर्भ**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** शिवसेना – उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने शहरातील पाणीटंचाईच्या गंभीर प्रश्नाला हात घालत लबाडांनो पाणी द्या या आंदोलनाच्या माध्यमातून प्रशासनाला जाब विचारण्याचा यशस्वी प्रयत्न केला. वीस दिवसांच्या या आंदोलनाने लाखो नागरिकांपर्यंत पोहोचत, पाणीटंचाईच्या समस्येवर ठोस उपाययोजनांची मागणी केली. शेकडो शिवसैनिक, हजारो नागरिक, साठ हजार स्वाक्षरी आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून ९ लाखांहून अधिक लोकांपर्यंत पोहोचलेल्या या आंदोलनाने प्रशासनाच्या नाकर्ते पणावर बोट ठेवले आहे. अशी माहिती विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी माध्यमांशी बोलताना दिली. यावेळी ते म्हणाले की, शहरातील १६८० कोटींची पाणी योजना आता २७४० कोटींवर गेली असून, यातील १०६० कोटींचा अतिरिक्त खर्च सामान्य नागरिकांवर लादला जात असल्याचा गंभीर आरोप शिवसेनेने केला आहे. या आंदोलनाने केवळ पाणीटंचाईच्या प्रश्नाला व्यासपीठ मिळवून दिले नाही, तर सामान्य नागरिकांच्या व्यथा आणि मागण्यांना बळ देण्याचे काम केले. शिवसैनिकांनी विविध उपक्रमांच्या माध्यमातून शहरातील प्रत्येक कोपऱ्यात आपला संदेश पोहोचवला. भिंती रंगवण्यापासून ते रिकाम्या हंड्यांचे तोरण



बांधण्यापर्यंत, कट्टा बैठकींपासून ते स्वाक्षरी मोहिमे पर्यंत, प्रत्येक उपक्रमाने नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण केली. आंदोलनाची सुरुवात १३ एप्रिल रोजी ५५० कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांच्या मेळाव्यासह झाली. या मेळाव्यात पाणीटंचाईच्या प्रश्नावर ठोस उपाययोजना आणि नागरिकांच्या मागण्यांना बळ देण्याचा निर्धार करण्यात आला. या मेळाव्याने आंदोलनाला दिशा दिली. आणि शिवसैनिकांना एकजुटीने लढण्यासाठी प्रेरित केले. १४ ते १७ एप्रिल दरम्यान शहरातील ४७ ठिकाणी १३,००० चौरस फ ुट भिंतींवर लबाडांनो पाणी द्या हा संदेश रंगवण्यात आला. या उपक्रमाने केवळ नागरिकांचे लक्ष वेधले नाही, तर आंदोलनाला व्यापक स्वरूप प्राप्त झाले. रस्त्यांवर, गल्लीबोळांत आणि सार्वजनिक ठिकाणी रंगवलेल्या या संदेशांनी पाणीटंचाईच्या प्रश्नाला प्रत्येक घरापर्यंत पोहोचवले. १८ एप्रिल रोजी १६०० शिवसैनिकांनी मुकुंदवाडी, हरसूल टी पॉइंट, रेल्वे स्टेशन रोड आणि बाबा पेट्रोल पंप येथे रिकाम्या हंड्यांचे तोरण बांधले. शहराच्या चारही प्रवेशद्वारांवर राबवलेल्या या उपक्रमाने पाणीटंचाईच्या तीव्रतेवर प्रकाश टाकला. रिकामे हंडे प्रशासनाच्या नाकर्तेपणाचे प्रतीक बनले आणि नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त झाला. १९ ते २१ एप्रिल दरम्यान शहरातील विविध भागांमध्ये ५,५०० नागरिकांशी थेट संवाद साधण्यासाठी कट्टा बैठका घेण्यात आल्या. सिद्धार्थ उद्यान, मराठवाडा सांस्कृतिक मंडळ, संभाजीनगर लेणी, खडी रोड, मल्हार चौक, अल्टिमेट जिम, गरवारे स्टेडियम, छत्रपती महाविद्यालय, केटली गार्डन, रामनगर चौक, चिकलठाणा, मुकुंदवाडी, हिमायत बाग, स्वामी विवेकानंद उद्यान, स्व. बाळासाहेब ठाकरे उद्यान, दर्गा चौक, विभागीय क्रीडा संकुल, सुधाकर नगर, कारगिल मैदान, विद्या नगर, एन–२ क्रिकेट मैदान, हरसुल कारागृह, कृषी उत्पन्न बाजार समिती, स्व. प्रमोद महाजन क्रीडा संकुल, अयोध्या नगरी, वेदांत नगर, ज्योति नगर, एन–६, बोटॅनिकल उद्यान आणि रामलीला मैदान येथे या बैठका घेण्यात आल्या. या बैठकींमुळे नागरिकांच्या समस्या समजून घेण्यास आणि त्यांना आंदोलनात सहभागी करून घेण्यास मदत झाली. २२ ते २४ एप्रिल दरम्यान गुलमंदी, एन–९, सुतगिरणी चौक, संग्राम नगर, आविष्कार कॉलनी, जय भवानी नगर, पान दरीबा, बेगमपुरा, त्रिमूर्ति चौक, गजानन मंदिर, नारेगाव, चिकलठाणा, हरसुल मैदान, क्रांति चौक, राम मंदिर, उस्मानपूरा, शिवाजीनगर, गारखेडा आणि मुकुंदवाडी येथे स्वाक्षरी मोहीम राबवली गेली. या मोहिमेत ५८,७०० स्वाक्षरी संकलित करण्यात आल्या, ज्यामुळे पाणीटंचाईविरुद्ध जनतेचा रोष स्पष्ट झाला. २४ ते २५ एप्रिल रोजी महिला आघाडीने १० झोनमध्ये निवेदने सादर करून पाणीटंचाईच्या प्रश्नावर प्रशासनाला जाब विचारला. महिलांनी या प्रश्नावर आक्रमक भूमिका घेत आपल्या मागण्यांना बळ दिले. २५ एप्रिल रोजी पुंडलिकनगर आणि जय विश्व भारती कॉलनी येथे ५०० नागरिकांनी ढोल बाजाओ उपक्रमात सहभाग घेतला. या उपक्रमाने पाणीटंचाईच्या प्रश्नाला संगीतमय पद्धतीने आवाज दिला. २६ एप्रिल रोजी एन–५ येथे १,००० नागरिकांनी दिंडी आणि भजन आंदोलनात सहभाग घेतला. या उपक्रमाने आंदोलनाला आध्यात्मिक आणि सांस्कृतिक आयाम दिला. २७ ते २९ एप्रिल आणि १ ते २ मे दरम्यान ३०० विद्यार्थ्यांनी पाणीटंचाई आणि त्यावरील उपाययोजनांवर जागरूकता वाढवण्यासाठी निबंध आणि वक्तृत्व स्पर्धेत भाग घेतला. या स्पर्धांनी तरुण पिढीला या प्रश्नाशी जोडले. २७ एप्रिल रोजी क्रांति चौकात ५०० नागरिकांच्या उपस्थितीत पाणी की अदालत हा अनोखा उपक्रम राबवला गेला. या उपक्रमात प्रशासनाच्या नाकर्तेपणावर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले. २ ते ३ मे रोजी शहरातील २७ ठिकाणी ५५० नागरिकांनी जलकुंभ पूजन केले. या उपक्रमाने पाण्याच्या महत्त्वावर प्रकाश टाकला. ३ मे रोजी पहाडसिंगपुरा आणि भावसिंगपुरा येथे मला राग येतोय हा उपक्रम राबवला गेला. यामध्ये महिलांनी आपला संताप व्यक्त केला. त्याचप्रमाणे ऑनलाइन पिटिशनच्या माध्यमातून आंदोलनाला डिजिटल व्यासपीठ मिळाले. लबाडांनो पाणी द्या आंदोलनाने छत्रपती संभाजीनगरातील पाणीटंचाईच्या प्रश्नाला राष्ट्रीय स्तरावर व्यासपीठ मिळवून दिले. ५८,७०० स्वाक्षरी, हजारो नागरिकांचा सहभाग आणि विविध उपक्रमांमुळे प्रशासनावर दबाव निर्माण झाला आहे. शिवसेनेने या आंदोलनाच्या माध्यमातून सामान्य नागरिकांच्या मागण्यांना आवाज दिला असून, पाणीटंचाईच्या प्रश्नावर ठोस उपाययोजना होईपर्यंत लढा सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. अशी माहिती परिषदेचे विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

पान १ वरून...

## पाकिस्तानच्या १२ सैनिकांचा खात्मा

पुन्हा हल्ला चढवला आहे. यात सैन्याची गाडी रिमोटने उडवली असून या भीषण स्फोटात अनेकांचा खात्मा झाल्याची माहिती पुढे आली आहे. गेल्या २४ तासातला दुसरा मोठा हल्ला, पाक सैन्यातील अनेकांचा खात्मा

एकीकडे भारतीय सैन्याने पाकव्याप्त काश्मीरसह पाकिस्तानलगतच्या भागात शिरून आणि पाकिस्तानच्या रडारला पत्ता ही लागून न देता दहशतवादी तळांवर एअर स्ट्राईक केलाय. भारतीय वायूदलाच्या या हल्लयामुळे पाकिस्तानी लष्कर प्रचंड धास्तावलंय असताना बलुचिस्तानमध्ये बलूच विद्रोह्यांनी पाकिस्तानी सैन्यावर पुन्हा हल्ला चढवलाय. मिळालेल्या माहितीनुसार या हल्लयात ७ हून अधिक लोक मारल्या गेल्याचे सांगितलं जातंय.

तर दुसरीकडे गेल्या चोवीस तासांतील हा दुसरा मोठा हल्ला असल्याने पाकिस्तान मोठ्या अडचणीत सापडला आहे. बलूच विद्रोह्यांनी हा हल्ला बोलानमधील माछकुंड येथे केला असून यात सैन्याच्या गाडीला लक्ष्य केलं. बलूच लिबरेशन आर्मीने रिमोटच्या मदतीने गाडी उडवून देत हा हल्ला केलाय. पाकिस्तानी सैन्य एका ऑपरेशनची तयारी करत असतानाच हा हल्ला झाला असल्याचे सांगितले जातंय.

## जम्मू, पठाणकोट, जैसलमेर,

ब्लॅकआऊट करण्यात आले आणि सायरन वाजवून लोकांना सावध करण्यात आलं. त्यानंतर या प्रदेशाचा ताबा लष्कराने घेतला.

दरम्यान, भारताची डिफेन्स सिस्टिम एस ४०० सक्रिय झाली आणि त्या माध्यमातून भारताने पाकिस्तानचे अनेक ड्रोनला हवेतच लक्ष्य केलं.

**जम्मूमध्ये ड्रोन हल्ले कुठे झाले?**

पाकिस्तानने ड्रोनने हल्ला करण्याचा प्रयत्न केलेल्या ठिकाणी जम्मू विमानतळ, जम्मू रेल्वे स्टेशन, चन्नी हिम्मत आणि जम्मूला लागून असलेला सीमावर्ती भाग आरएस पुरा यांचा समावेश आहे. भारताच्या हवाई संरक्षण प्रणाली ड–४०० ने पाकिस्तानच्या या हल्ल्याच्या प्रयत्नांना हाणून पाडले.

**पाकिस्तानची आगळीक सुरूच**

पाकिस्तानच्या दहशतवादाला भारताने ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून प्रत्युत्तर दिलं आणि नऊ ठिकाणी हल्ला करून दहशतवादी तळं उद्ध्वस्त केली. त्यानंतर गुरुवारी सकाळी पाकिस्तानने शस्त्रसंधीचं उल्लंघन करुन सीमाभागात गोळीबार केला. तसेच भारताच्या १५ शहरांवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. पाकिस्तानच्या या हल्ल्याला प्रत्युत्तर देत भारताने लाहोरमध्ये ड्रोन घुसवून त्यांची एअर डिफेन्स सिस्टिम निकामी केली. त्यामुळे पाकिस्तानची जगभरात नाचक्की झाली. परिणामी पाकिस्तानमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झालं. तरीही पाकिस्तानने आता पुन्हा आगळीक केली आणि जम्मूवर ड्रोन हल्ला केला.

**भारताने अनेक ड्रोन पाडले**

पाकिस्तानच्या ड्रोन हल्ल्याला भारताने चोख प्रत्युत्तर दिलं आहे. भारताची एस ४०० ही डिफेन्स सिस्टिम सक्रिय झाली असून त्याने पाकिस्तानचे अनेक ड्रोन हवेतच नष्ट केले. जम्मूमध्ये नेमके किती ड्रोन आले याची नेमकी माहिती समोर आली नाही. पण भारताकडून ते सर्व ड्रोन पाडण्याची कारवाई सुरू आहे.

**विमानतळ लक्ष्य होतं**

जम्मूतील विमानतळ हे पाकिस्तानचे लक्ष्य होतं अशी माहिती समोर आली आहे. जम्मूच्या विमानतळाच्या दिशेने जवळपास आठ ड्रोन येत होते. पण ते सर्वच ड्रोन हवेतच पाडण्यास भारताला यस आलं आहे.

**राजस्थानमध्येही ब्लॅकआऊट**

जम्मूनंतर राजस्थानच्या सीमावर्ती भागातही ब्कॅकआऊट करण्यात आल्याची माहिती समोर येत आहे. या सर्व सीमावर्ती भागात भारतीय लष्कर सक्रिय झालं आहे.

**भारताचे प्रत्युत्तर सुरू**

पाकिस्तानच्या आगळीकतेला भारताने आता प्रत्युत्तर द्यायला सुरुवात केली असून पाकिस्तानवर हल्ला सुरू केला आहे. पाकिस्तानच्या भागात त्यामुळे गोंधळाची परिस्थिती निर्माण झाल्याचं चित्र आहे.

## एअरफोर्सला सरकारचा फ्री-हँड

हल्ला होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे केंद्र सरकारने देशातील २७ विमानतळं बंद करण्याचे आदेश दिले आहेत. यामध्ये श्रीनगर, जम्मू, चंदीगढ, अमृतसर आणि लुधियाना येथील विमानतळांचा समावेश आहे. पाकिस्तानच्या संभाव्य हल्लयाच्या पार्श्र्वभूमीवर सीमारेषेवरील फिरोजपूर जिल्ह्यातील अनेक गावे भारतीय सैन्याकडून खाली केली जात आहेत. पाकिस्तानी सैन्याने सीमारेषेवरील भारतीय गावांवर केलेल्या हल्लयात १३ नागरिकांचा मृत्यू झाला आहे.

पाकिस्तानमध्ये भारतीय सैन्याने केलेल्या एअर स्ट्राईकनंतर महाराष्ट्रात हायअलर्ट जारी करण्यात आला आहे. राज्यातील महत्त्वाच्या संस्था, पर्यटन स्थळे आणि धार्मिक स्थळांची सुरक्षा वाढवण्यात आली आहे. या सर्व ठिकाणी पोलिसांना सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

# एमबीबीएसचं शिक्षण पूर्ण करुन सिनेक्षेत्रात, टॉलिवूडमध्ये मोठं यश; कोट्यावधींच्या जाहिरातींवर लाथ मारली; काश्मिरी पंडितांबाबत म्हणाली...

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** अभिनेत्री साई पल्लवी दाक्षिणात्य सिनेक्षेत्रातील एक यशस्वी अभिनेत्री म्हणून ओळखली जाते. मात्र, अनेकांना माहिती नसेल, पण अभिनय क्षेत्रात पदार्पण करण्यापूर्वी साईने एमबीबीएसचं शिक्षण पूर्ण केलं होतं. नॅचरल ब्यूटी या नावाने प्रसिद्ध असलेल्या साईने फेअरनेस क्रीमच्या जाहिरातीसाठी मिळालेली कोट्यवधींची ऑफर नाकारली होती. तिच्या स्पष्टवक्तेपणामुळे ती अनेकदा वादाच्या भोवऱ्यातही सापडली आहे.

फेअरनेस क्रीमच्या कोट्यावधींच्या जाहिरातीवर लाथ मारली

साई पल्लवीला २०१९ साली एका कंपनीकडून फेअरनेस क्रीमच्या जाहिरातीसाठी २ ते ३ कोटी रुपयांची ऑफर देण्यात आली होती. मात्र, साईने ती जाहिरात नाकारली. तिचं स्पष्ट मत होतं की, ती अशा गोष्टींचं प्रमोशन करणार नाही. एका मुलाखतीत तिने सांगितले की, ती खूप मेकअप करण्याच्या बाजूने नाही. ती भारतीय आहे आणि आपल्याला जो रंग मिळाला आहे, तोच योग्य आहे. तिच्या या निर्णयाचं सोशल मीडियावर भरभरून कौतुक झालं होतं.

स्पष्टवक्तेपणामुळे वादातही सापडली होती साई पल्लवी

साई पल्लवीच्या अभिनय कौशल्याची, सौंदर्याची आणि साधेपणाची सर्वत्र प्रशंसा होते. मात्र, तिच्या बेधडक मतांमुळे ती अनेकदा वादात सापडली आहे. अलीकडेच दिलेल्या एका मुलाखतीत तिने दिग्दर्शक विवेक रंजन अग्निहोत्री यांच्या 'द काश्मीर फाइल्स' चित्रपटाबद्दल भाष्य केले. या चित्रपटात दाखवण्यात आलेल्या काश्मिरी पंडितांच्या हत्यांची तिने गोरक्षकांद्वारे मुस्लिम तरुणांना मारहाण करण्यात आलेल्या घटनेशी तुलना केली होती.

काश्मिरी पंडितांच्या नरसंहारावर मत

साई पल्लवी म्हणाली होती की, 'द काश्मीर फाइल्स' मध्ये दाखवले आहे की काश्मिरी पंडितांना कसे मारण्यात आले. यासोबतच तिने एक प्रसंग सांगितला ज्यात एका मुस्लिम तरुणाने गाडीमध्ये गाय ठेवली होती आणि त्याला मारहाण करत 'जय श्रीराम'च्या घोषणा द्यायला लावल्या गेल्या. ती म्हणाली की, जर धर्मीय संघर्षाबद्दल बोलायचं असेल, तर या दोन्ही घटनांमध्ये फरक काय? तिच्या मते, काश्मिरी पंडितांचा नरसंहार तेव्हा झाला आणि ही घटना आता घडली. आपण स्वतः योग्य असलो तरच योग्यतेसाठी आवाज उठवू शकतो.

सिनेमा कारकीर्द

साई पल्लवीने २००५ साली 'कस्तुरी मान' या चित्रपटातून पदार्पण केले. त्यानंतर तिने काली, मिडल क्लास, मारी, लव्ह स्टोरी, श्याम सिंह रॉय, गार्गी, अमरन, आणि तंडेल या चित्रपटांमध्ये अभिनय केला.

साई पल्लवीचे आगामी प्रोजेक्ट्स

साई लवकरच नितेश तिवारी यांच्या 'रामायण' चित्रपटात झळकणार आहे. या चित्रपटात ती माता सीतेच्या भूमिकेत दिसेल, तर रणबीर कपूर भगवान रामाची भूमिका साकारेल. 'केजीएफ' फेम यश लंकेच्या रावणाच्या भूमिकेत झळकणार आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707


हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# पाचोऱ्यातील फौजी जवान लग्नाच्या बोहल्यावरुन उतरताच देशाच्या सिमेवर रवाना

## हळद फिटली नाही :मेहंदी मिटली नाही

दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी :** मागील आठवड्यात काश्मीर पहलगाम येथे झालेल्या पाकिस्तानी दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ भारत सरकारने ७ मे रोजी सिंदुर ऑपरेशन यशस्वी केले आहे. यामध्ये नऊ ठिकाणी हवाई मारा करत पाकिस्तानी दहशतवाद्यांचा खात्मा केला असून भारत आणि पाकिस्तान मध्ये कोणत्याही वेळेला युद्धजन्य परिस्थिती निर्माण होऊ शकते यामुळे जे जवान घरी सुट्टीसाठी आले होते अशा सर्व जवानांना सीमेवर बोलवण्याचे आदेश प्राप्त झाल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. यामध्ये जळगाव जिल्ह्यातील पाचोरा तालुक्यातील खेडगाव नंदीचे गावातील असलेल्या मनोज ज्ञानेश्वर पाटील





यांचा चि. सौ. का. यामिनी हिच्याशी नुकताच ५ मे रोजी विवाह संपन्न झाला होता. परंतु विवाह झाल्यावर तात्काळ त्यांना सेवेमध्ये रुजू होण्याचे आदेश आले आहेत.

मनोज याने आपल्या अर्धांगिनीला परत येण्याचा विश्वास देऊन देशाची सेवा करण्याचा मार्ग निवडला असून देशसेवेचे धाडस दाखवून पुन्हा आपल्या नियुक्तीच्या ठिकाणी रवाना झाला आहे. या धाडसी निर्णयाचे सर्वत्र परिसरात मनोज पाटील यांचे अभिनंदन व कौतुक करण्यात येत आहे यावेळी पाचोरा काँग्रेस तालुका अध्यक्ष सचिन सोमवंशी यांनी जवान मनोज पाटील यांच्या घरी जाऊन सत्कार केला युद्ध होवु नये आणि जवान परत यावा म्हणून परमेश्वराला प्रार्थना केली.पाटिल परीवाराला धिर देत आपल्या उत्तर महाराष्ट्रातील हा अभिमानाचा दिवस आहे देशाच्या सुरक्षिततेसाठी जवान मनोज पाटील यास हळद फिटली नाही आणि मेहंदी मिटली नाही अशा स्थितीत कॉल येणे हा सर्वांनासाठी अभिमान वाटावा असा प्रसंग असल्याचे शेवटी श्री सोमवंशी म्हणाले.

पाचोरा शहरातील स्व. राजीव गांधी कॉलनीत सद्ध्या मनोज पाटील यांचा रहीवास होता तेथुनच ते रवाना झाले. त्याचबरोबर गावातील ज्येष्ठ नागरिकांच्या वतीने सदर सैनिक आमच्या गावाची शान असून आमचा सैनिक एक नव्हे तर दहा पाकिस्तानीचा खात्मा करूनच विजय मिळवतील असा विश्वास या ठिकाणी व्यक्त केला आहे.यावेळी सेवानिवृत्त पोलीस अधिकारी विजयसिंग पाटील यांनी देखील सत्कार केला. पाचोरा रेल्वे स्थानकावर जवान मनोज पाटील यांस देशाच्या सरहद्दीवर रवाना करतांना आई वडील आणि पत्नी भाऊ सह इतरांचे अश्रू अनावर झाले होते.

## संक्षिप्त...

### इंस्टाग्राम स्टेटसवर पाकिस्तानला सपोर्ट करणाऱ्या इसमाला अटक; भिवंडी शहर पोलीस स्टेशनमध्ये इसमाविरुध्द देशद्रोहाचा गुन्हा दाखल



दैनिक आपला विदर्भ

**भिवंडी/प्रतिनिधी :** इंस्टाग्राम आयडीवर स्टेटस वरुन पाकिस्तानला सपोर्ट दर्शविलेल्या इसमाला पोलिसांनी घेतले ताब्यात घेतले आहे. सदर इसमाविरुद्ध शहर पोलीस स्टेशन येथे देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्राप्त माहितीनुसार भिवंडी शहरातील घुंगट नगर परिसरात राहणाऱ्या अफसर आली अजगर अली शेख या तरुणाने आपल्या इंस्टाग्राम आयडीवर स्टेटस म्हणून पाकिस्तानला सपोर्ट केला. त्यामुळे या तरुणाला ताब्यात घेण्यात आले आहे. या तरुणाने आपल्या इंस्टाग्राम च्या स्टेटस वर ''चाहे जो हो जाये सपोर्ट तो बस पाकिस्तान को करेंगे'' असा स्टेटस ठेवल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. पोलिसांनी या तरुणाला ताब्यात घेत अटक केली आहे. या तरुणाच्या विरोधात बी एन एस कलम १५२ अंतर्गत देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून या तरुणाला अटक करण्यात आली आहे.अशी माहिती शहर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कृष्णदेव खराटे यांनी माध्यमांशी बोलताना दिली आहे.

### उत्तरकाशीत हेलिकॉप्टर कोसळले, तीन मुंबईकरांचा मृत्यू

उत्तरकाशी,: उत्तराखंडमधील उत्तरकाशी जिल्ह्यात हेलिकॉप्टर कोसळले. या दुर्घटनेत वैमानिकासह एकूण सहा जणांचा मृत्यू झाला असून एक प्रवासी गंभीर जखमी आहे. जखमी व्यक्तीला उपचारांसाठी एम्स हृषिकेश येथे दाखल करण्यात आले आहे.

हेलिकॉप्टर एअरोट्रान्स कंपनीचे होते. हे हेलिकॉप्टर सहस्त्रधारा हेलिपॅड येथून उड्डाण केल्यानंतर हर्षिलच्या दिशेने येत होते. या हेलिकॉप्टरमध्ये वैमानिक आणि सहा प्रवासी असे एकूण सात जण होते. प्रवाशांपैकी चार जण मुंबईचे आणि दोन जण आंध्रचे रहिवासी होते. मृतांमध्ये तीन मुंबईकर आहेत.

उत्तरकाशी जिल्ह्यात गुरुवार ८ मे २०२५ रोजी सकाळी पावणेनऊच्या सुमारास गंगोत्री राष्ट्रीय महामार्गावर गंगनानी जवळ हेलिकॉप्टर कोसळले. दुर्घटनेची माहिती मिळताच एसडीआरएफ, पोलीस, वैद्यकीय पथक, रुग्णवाहिका, अग्निशमन दलाचे पथक आणि स्थानिक यांनी तातडीने घटनास्थळी पोहोचून मदतकार्य सुरू केले.

अपघाताची माहिती मिळताच उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्करसिंह धामी यांनी एक्स पोस्ट करुन शोक व्यक्त केला. दुर्घटनेच्या चौकशीचे आदेश दिल्याचे मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले. नियमानुसार मृतांच्या नातलगांना आणि जखमी व्यक्तीला उपचारांसाठी आर्थिक मदत दिली जाणार असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. उत्तराखंडमध्ये मागील दोन - चार दिवसांपासून वातावरण प्रतिकूल आहे. उन्हाळ्याच्या दिवसांत अवकाळी पाऊस सुरू आहे. काही ठिकाणी गारपीट झाली आहे. वादळी वारे वाहू लागल्यामुळे काही ठिकाणी नुकसान झाले आहे.

हेलिकॉप्टर अपघातातील मृतांची यादी

कला सोनी, ६१, मुंबई विजया रेड्डी, ५७, मुंबई

रुची अग्रवाल, ५६, मुंबई राधा अग्रवाल, ७९, उत्तर प्रदेश वेदवती कुमारी, ४८, आंध्र प्रदेश वैमानिक रॉबिन सिंह, ६०, गुजरात गंभीर जखमी

मस्तू भाकर, ६०, आंध्र प्रदेश

# नझुल रेकॉर्ड प्रमाणे रस्त्याचे सेंटर काढल्यानंतर अतिक्रमण काढा अन्यथा आंदोलन : व्यावसायिकांचा इशारा

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी :** डोणगाव येथील मुख्य रस्त्याचे सेंटर भूमी अभिलेख कार्यालयाकडून काढण्यात यावे, त्यानंतर आजुबाजुचे अतिक्रमण हटवावे, अन्यथा व्यवसायिकाच्या वतीने आंदोलन करण्यात येईल. असा इशारा नुकत्याच पार पडलेल्या व्यावसायिकांच्या बैठकीमध्ये सर्वानुमते देण्यात आला.

डोणगाव येथील व्यावसायिक मागील अनेक वर्षांपासून भूमी अभिलेख मार्फत नझुल रेकॉर्ड प्रमाणे रस्त्याचा सेंटर पॉईंट काढून द्या, अशी ही मागणी करण्यात आली आहे.मात्र, याकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे.डोणगाव हा मुंबई-नागपूर या महामार्गावर वसलेला असून गावाच्या मध्यातून हा महामार्ग गेलेला आहे. अश्यात नेहमी रस्त्याचे काम होत राहते. मात्र, कधीही मोजमाप झालेली नाही. या रस्त्याचा सेंटर पॉईंट कोणता हे अद्यापही येथील नागरिकांना माहीत नाही. ज्याने कोणते दुकान अतिक्रमणामध्ये आहे. हे ठरवल्या गेलेलेच नाही. त्यावर येथील व्यावसायिकांनी जिल्हाधिकारी, उपविभागीय महसूल अधिकारी, राज्य रस्ते विकास मंडळ, राष्ट्रीय रस्ते प्राधिकरण अश्या अनेक ठिकाणी रस्त्याचा सेंटर पॉईंट निश्चित करण्या साठी निवेदने दिलीत. मात्र, यावर अद्यापही कोणतीही कार्यवाही झालेली नाही. तेव्हा मुंबई नागपूर राष्ट्रीय महामार्गाचा भूमी अभिलेख मार्फत मोजमाप करून रस्त्याचा सेंटर पॉईंट काढण्याची मागणी होत आहे.

डोणगावमधून मुंबई-नागपूर महामार्ग जातो. जो सध्या राष्ट्रीय महामार्ग आहे. अश्यात या रस्त्याचे वेळोवेळी काम झाले. तेव्हा रस्ता जसा आहे तश्याच प्रकारे त्यावर डांबरीकरण होत गेले.रस्त्याचा सेंटर पॉईंट कोणता हे कधीच मोजल्या गेलेले नसल्याने हा रस्ता कोणत्या बाजुने सरकला, किती सरकला, या बद्दल कोणाला कोणतीही माहिती नसतांना संबंधीत विभाग सध्या अस्तित्वात असलेल्या रस्त्याचे मोजमाप करून अतिक्रमण ठरवते. यासाठी भूमी अभिलेख विभागामार्फत नझुल रेकॉर्ड प्रमाणे मोजमाप होऊन रस्त्याचा सेंटर पॉईंट काढला जात नसल्याने व्यावसायिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. मागील ५ वर्षांपासून वेळोवेळी राज्य रस्ते विकास मंडळ, राष्ट्रीय रस्ते प्राधिकरण, जिल्हाधिकारी, उपविभाग अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग अश्या अनेक ठिकाणी वेळोवेळी निवेदने दिल्या गेली. २०२२ मधे तत्कालीन जिल्हाधिकारी यांना डोणगाव येथील व्यापाऱ्यांनी निवेदन देवून आपली समस्या सांगितली होती. त्या नुसार त्यांनी संबंधीत विभागाला फोन करून सुचना सुद्धा दिल्या होत्या.मात्र, कोणतीही कार्यवाही झालेली नाही.अश्यात ४ मे रोजी व्यापारी संघटनेची बैठक होऊन त्यात भूमिअभिलेख मार्फत रस्त्याची मोजमाप केल्या शिवाय अतिक्रमण काढण्याची कोणतीही कार्यवाही करू नये, अन्यथा सर्व व्यावसायिक रस्त्यावर उतरून लोकशाही मार्गाने आंदोलन करतील अशी भूमिका घेतली.

### नझुल रेकॉर्ड प्रमाणे रस्त्याची मोजमाप करा

डोणगाव येथील मुख्य रस्ता असलेल्या महामार्गाचे नजर रेकॉर्ड प्रमाणे मोजमाप करून सेंटर काढावे, साठी वेळोवेळी निवेदने दिली. भूमिअभिलेख मार्फत नझुल रेकॉर्डप्रमाणे रस्त्याचा मोजमाप करून नंतर कोणाचे अतिक्रमण आहे.हे ठरवा असे सांगितले. मात्र, अद्यापही त्यांच्याकडून उत्तर मिळालेले नसल्याने अतिक्रमण कोणाचे आहे. हे कसे निश्चित होणार असा प्रश्न उपस्थित होत आहे.

**-विनोद बोडगे,**
**व्यापारी संघटना अध्यक्ष, डोणगाव .**

### राज्यांच्या सीमा सील, शूट अॅट साइटचे आदेश

जम्मू,: पाकिस्तान आणि पाकव्याप्त जम्मू-कश्मीरमध्ये भारताने हवाई हल्ला केल्यानंतर भारतात सीमेलगत असलेल्या राज्यांना हायअलर्ट देण्यात आला आहे. राजस्थान आणि पंजाब राज्य अलर्ट मोडवर असून पोलिसांच्या सर्व सुट्ट्या रद्द करण्यात आल्या आहेत. तसंच, सार्वजनिक कार्यक्रमांवर बंदी घालण्यात आली आहे. एनडीटीव्हीने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.

राजस्थान आणि पंजाबच्या सीमा सील

राजस्थानची १ हजार ३७ किमीची सीमा पाकिस्तानला लागून आहे. त्यामुळे या राज्यात हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे. या राज्याची सीमा पूर्णपणे सील करण्यात आली असून संशयास्पद हालचाली आढळल्यास सीमा सुरक्षा दलाच्या जवानांना शूट अॅट साईटचे आदेश देण्यात आले आहेत. तसंच, भारतीय हवाई दलही सज्ज आहे. पश्चिम क्षेत्रातील आकाशात लढाऊ विमाने गस्त घालत असल्याने जोधपूर, किशनग्रह आणि बिकानेर विमानतळ ८ मेपर्यंत बंद ठेवण्यात आले आहेत. तसंच, क्षेपणास्त्र संरक्षण प्रणाली सक्रिय करण्यात आली आहे.

सुखोई-३० एमकेआय जेट्स गंगानगर ते कच्छच्या रणपर्यंत हवाई गस्त घालत आहेत. बिकानेर, श्री गंगानगर, जैसलमेर आणि बारमेर जिल्ह्यातील शाळा बंद करण्यात आल्या आहेत आणि चालू परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. पोलीस आणि रेल्वे कर्मचाऱ्यांच्या सुट्ट्या रद्द करण्यात आल्या आहेत. सीमावर्ती गावे हाय अलर्टवर आहेत आणि आपत्कालीन परिस्थितीत त्यांना दुसरीकडे स्थलांतर करण्याचीही योजना आखण्यात आली आहे. सीमेजवळील ड्रोनविरोधी यंत्रणा देखील सक्रिय करण्यात आल्या आहेत. जैसलमेर आणि जोधपूरसाठी मध्यरात्री ते पहाटे ४ वाजेपर्यंत ब्लॅकआउट करण्याचे आदेश जारी करण्यात आले आहेत. ब्लॅकआउटमुळे हाय-स्पीड विमानांसाठी समस्या निर्माण होतात, ज्यामुळे शत्रूच्या वैमानिकांना हल्ला करणे कठीण होते. पंजाबमध्येही सर्व पोलिस कर्मचाऱ्यांच्या सुट्ट्या रद्द करण्यात आल्या आहेत आणि सार्वजनिक कार्यक्रमांवर बंदी घालण्यात आली आहे.

### लाहोरमध्ये लागोपाठ तीन स्फोट, पाकिस्तानमध्ये भीतीचे वातावरण

लाहोर,: भारतीय सैन्याने बुधवार ७ मे रोजी पाकिस्तानमध्ये अतिरेक्यांच्या विरोधात केलेल्या 'ऑपरेशन सिंदूर' नंतर गुरुवार ८ मे रोजी लाहोरमध्ये लागोपाठ तीन स्फोट झाले. या स्फोटांमुळे पाकिस्तानमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. भारताने पुन्हा हवाई हल्ला केल्याची चर्चा पाकिस्तानमध्ये सुरू झाली आहे. स्फोट लाहोरच्या जुन्या विमानतळाच्या जवळ झाले. लाहोरच्या जुन्या विमानतळाच्या आवारात ड्रोन पडला. यानंतर स्फोटाचा आवाज ऐकू आला, असे एका स्थानिकाने पाकिस्तानच्या प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींनी सांगितले. या घटनेनंतर लाहोरमधील विमानवाहतूक तातडीने थांबवण्यात आली आहे. लाहोरमधील वॉल्टन विमानतळ, गोपालनगर आणि नसराबाद या तीन ठिकाणी असे एकूण तीन स्फोट झाल्याचे वृत्त पाकिस्तानच्या प्रसारमाध्यमांनी दिले आहे. 'ऑपरेशन सिंदूर' नंतर हा दुसरा हल्ला झाल्याचे पाकिस्तानमधील निवडक वृत्तवाहिन्या सांगत आहे. भारताने या स्फोटांबाबत अद्याप काहीही सांगितलेले नाही.

# भारताचा पाकवर आणखी एक स्ट्राईक

## दोन मोठ्या धरणांचे दरवाजे उघडले, पाकिस्तानात पुराचा धोका वाढला

नवी दिल्ली : भारतानं चिनाब नदीवर बांधलेल्या रियासी येथील सलाल धरणाचे तीन दरवाजे उघडले. या धरणातून आतापर्यंत पाकिस्तानकडे जाणारं पाणी रोखण्यात आलं होतं. सिंधू जलकरार स्थगित केल्यानंतर हे पाऊल उचलण्यात आलं होतं. आता पुन्हा एकदा सलाल धरणाचे दरवाजे उघडल्यानंतर पाकव्याप्त काश्मीरमध्ये पूर येण्याची शक्यता वाढू शकते.

भारतानं सलाल आणि बगलिहार धरणातून पाणी सोडल्यानं पुराचं संकट निर्माण झालं आहे. जोरदार पावसामुळं भारतानं रामबन येथील बगलिहार धरणाचा दरवाजा उघडला आहे. भारतानं हे स्पष्ट केलंय की सिंधू जल करार स्थगित झालेला आहे. त्यामुळं आता या धरणांमधून किती पाणी सोडायचं हा निर्णय भारताच्या हातात आहे. भारतानं यापूर्वी चिनाब नदीतील पाणी रोखलं होतं. आता दरवाजा उघडल्यानं पाणी पाकिस्तानात पोहोचेल.

भारतानं सलाल आणि बगलिहार धरणातून पाणी का सोडण्यात आलं याचं कारण सांगण्यात आलेलं नाही. भारतानं अचानक पाणी सोडल्यानं पाकिस्तानातील लोकांच्या अडचणी वाढू शकतात. यामुळं पाकिस्तानी नागरिक त्यांच्या सरकारला प्रश्न विचारु शकतात.

विदेश मंत्रालय आणि संरक्षण दलाकडून आज देखील पत्रकार परिषद घेण्यात आली. विदेश मंत्रालयाचे सचिव विक्रम मिसरी, विंग कमांडर व्योमिका सिंग आणि कर्नल सोफिया कुरेशी यांनी कालपासून आजपर्यंत काय घडलं याबाबत



माहिती दिली.

कर्नल सोफिया कुरेशी यांनी ७ मे २०२५ ला झालेल्या पत्रकार परिषेदत भारतानं आपली प्रतिक्रिया केंद्रीत, संतुलित आणि वादाला उत्तेजन देणारी नव्हती, असं सांगितलं होतं. भारतानं पाकिस्तानच्या लष्करी ठाण्यावर हल्ला केला नाही हे सांगण्यात आलं होतं. भारतीय सैन्यावर हल्ला केल्यास प्रत्युत्तर दिलं जाईल असं सांगितलं होतं, अशी आठवण सोफिया कुरेशी यांनी करुन दिली.

७ मे च्या रात्री पाकिस्ताननं भारताच्या उत्तर पश्चिमेतील पाकिस्ताननं अवंतीपुरा, श्रीनगर, जम्मू, पठाणकोट, अमृतसर, कपूरथला, जालंधर, लुधियाना, आदमपूर, भटिंडा, चंदीगड, नल, फलोदी, उत्तरलाई आणि भुज या ठिकाणांवर लष्करी हल्ल्याचा प्रयत्न केला. या हल्ल्यांना इंटिग्रेडेड काऊंटर यूएएस ग्रिड आणि वायूरक्षक प्रणालीद्वारे निष्क्रिय करण्यात आले. याचे अवशेष सापडले ज्यानं यात पाकिस्तानचा हात असल्याचं समोर आलं आहे, असं सोफिया कुरेशी म्हणाल्या.

आज सकाळी भारतानं पाकिस्तानच्या एअर डिफेन्स रडार आणि प्रणालीला लक्ष्य केलं. भारताची प्रतिक्रिया समान क्षेत्रात समान तीव्रतेनं देण्यात आली. विश्वसनीयरित्या माहिती मिळाली की लाहोर मधील एअर डिफेन्सला निष्क्रिय करण्यात आलं, अशी माहिती सोफिया कुरेशी यांनी दिली.

विविध वृत्त...

## गावाला शुद्ध पाणीपुरवठा करण्यात यावा यासाठी नागरिकाचे धरणाच्या चिखलात लोटांगण आंदोलन





दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्याच्या मेहकर तालुक्यातील घाटबोरी येथे ग्रामपंचायती कडून दहा ते बारा दिवसातून पाणीपुरवठा केला जात आहे आणि तोही दूषित पाणीपुरवठा होत असल्याचा आरोप करत, गावातीलच राजू कुसळकर यांनी ज्या धरणातून पाणीपुरवठा केला जात आहे. त्या धरणाच्या चिखलात लोटांगण आंदोलन करून गावात शुद्ध पाण्याचा पुरवठा करण्याची मागणी केली आहे. तर हे आंदोलन राजकीय विरोधकांकडून केले जात आहे, पाणी पातळी कमी झाल्याने, एका खाजगी विहिरीवरून गावात नळाद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे, पाण्याची तपासणी करूनच गावात शुद्ध पाणीपुरवठा केला जात असल्याची माहिती सरपंच राजू पाखरे यांनी दिली आहे.

## पीक विमा न मिळाल्याने शेतकरी संतप्त; चिखली कृषी कार्यालयात केले ठिय्या आंदोलन



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** चिखली तालुक्यातील शेतकऱ्यांना अद्याप पीक विमा मिळालेला नाही. याच कारणामुळे आज क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे नेते विनायक सरनाईक आणि नितीन राजपूत यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी चिखली येथील तालुका कृषी कार्यालयात ठिय्या आंदोलन सुरू केले. तालुक्यातील काही गावांना पीक विम्याचे पैसे मिळाले असले, तरी देऊळगाव घुबे आणि इतर काही गावांचे शेतकरी अजूनही वंचित आहेत. यामुळे नाराज शेतकऱ्यांनी आक्रमक भूमिका घेतली. काही शेतकऱ्यांनी असेही सांगितले की, त्यांच्या शेताचे पंचनामे झालेले असूनही त्याचा लाभ मिळालेला नाही. ''आम्हाला हेक्टरी किती पैसे मिळणार? आणि मिळणार की नाही?'' असे प्रश्न आंदोलक शेतकऱ्यांनी विचारले आहे.

## पीक विम्यातील बँकांच्या चुकांना बँकच जबाबदार - केंद्रीय मंत्री रक्षा खडसे




दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी :** अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीचा आढावा घेत केंद्रीय मंत्री रक्षा खडसे यांनी प्रशासनाला तातडीने पंचनामे करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच, पीक विम्यामध्ये बँकांची चूक आढळल्यास, त्यासाठी बँकच जबाबदार असेल. यात राहिलेल्या जळगाव जिल्ह्यातील सुमारे साडेतीन ते चार हजार नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत मिळणार आहे. असे देखील त्यांनी स्पष्ट केले आहे



# देशवासीयांची एकजूट, राजकीय इच्छाशक्ती आणि सैन्य दलाने केलेल्या गगनभेदी कारवाईतुन ''ऑपरेशन सिंदुर'' यशस्वी : केंद्रीय मंत्री जाधव

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** पहेलगाम येथिल पर्यटकांवर दहशतवादयांनी केलेल्या हल्ल्याचा बदला आज सकाळी भारतीय सैन्यांनी ''ऑपरेशन सिंदुर'' राबवत पाकीस्तानसह पाकव्याप्त काश्मिरमधील दहशतवादी तळांवर हल्ले करुन दहशतवादयांच कंबरडे मोडण्याच काम केल या ''ऑपरेशन सिंदुर'' मध्ये सहभागी झालेल्या सर्व सैन्यांच अभिनंदन करत देशवासीयांची एकजूट राजकीय इच्छाशक्तती, आणि सैन्याने केलेली गगनभेदी कारवाईतुनच ''ऑपरेशन सिंदुर'' यशस्वी झाल्याची प्रतिक्रीया केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटूंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी व्यक्त केली. २२ एप्रिल रोजी जम्मू काश्मिरातील पहेलगाम येथिल भारतीय पर्यटकांना लक्ष करत दहशतवादयांनी त्यांचा धर्म विचारुन त्यांची हत्या केली या दहशतवादी हल्ल्यात २६ निष्पाप पर्यटकांचा बळी गेला. या हल्ल्यानंतर पर्यटक भयभीत झालेले असतांना त्यांना आधार देण्यासाठी शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथराव शिंदे साहेब स्वत: जम्मू काश्मिरला आले. आपणसुध्दा पर्यटकांच्या मदतीला धावुन गेलो त्यावेळी प्रत्येक भारतीयांची भावना या हल्ल्याचा बदला घेण्याची होती. त्याचवेळी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या हल्ल्यातील दहशतवादयांना चोख प्रत्युत्तर देवुन दहशतवादयांचे कंबरडे मोडण्याचे सुतोवाच केले होते त्यानुसार सैन्यांनी केलेल्या नियोजनांनतर ७ मे च्या पहाटे पाकीस्तानसह पाकव्याप्त काश्मिरमधील ९ दहशतवादी तळ नष्ट करण्यात आले. ''ऑपरेशन सिंदुर'' मध्ये सहभागी झालेल्या सैनिकांच अभिनंदन करत भारतीय सैन्यांच्या क्षमतेवर देशवासीयांना पुर्ण विश्वास आहे. संपुर्ण देशवासीयांची एकजूट त्यांच्या पाठीमागे उभी आहे राजकीय इच्छाशक्ती आणि सैन्यदलाच्या गगनभेदी कारवाईतुनच ''ऑपरेशन सिंदुर'' यशस्वी झाले आहे. भारतीय वायुसेना, नौसेना आणि स्थलसेना नेतृत्वाचा सहभाग मोठा असुन ही कारवाई देशाच्या सीमेपलीकडे जाऊन दहशतवादयांचे कंबरडे मोडणारी आहे. अशा कारवायांसाठी राजकीय इच्छाशक्ती ही महत्वपुर्ण आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कणखर नेतृत्वाने ''ऑपरेशन'' सिंदुरच्या माध्यमातुन हे दाखवुन दिले आहे. दहशतवाद बिमोड करण्यासाठी अशा कारवाया सुरुच राहतील असा विश्वासही केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी या वेळी व्यक्त केला.



# आ. सिध्दार्थ खरात यांनी केले भारतीय सैन्य व पंतप्रधान मोदी यांचे अभिनंदन

दैनिक आपला विदर्भ



**मेहकर/प्रतिनिधी :** काश्मीर मधील पेहलगाम येथे २२ एप्रिल रोजी पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादी संघटनेने पर्यटकांवर हल्ला करून २६ नागरिकांची निर्गुण हत्या करण्यात आली होती. त्यामुळे देशाची एकात्मता आणि शांतता धोक्यात आली होती. त्याची प्रत्युत्तर देण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जो निर्णय घेतला तो योग्य असून भारतीय सैन्य व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाकिस्तानला जो धडा शिकवला तो एकदम योग्य असून या कारवाईबद्दल मी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाचे आमदार म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी व भारतीय सैनिकांचे अभिनंदन करतो. असे मत आमदार सिद्धार्थ खरात यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

२२ एप्रिल रोजी जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे पाकिस्तानी पुरस्कृत आतंकवादी संघटनांनी भारतीय पर्यटकांवर बेछुटपणे गोळीबार करून तब्बल २६ नागरिकांचे निघृण हत्या केली होती. त्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी व भारतीय सैन्य दलाच्या प्रमुखांनी रणनीती आखत पाकिस्तानवर ७ मे रोजी सकाळी तीन वाजताच्या दरम्यान हवाई हल्ला करत पाकिस्तान मधील दहशतवाद्याची नऊ ठिकाणी उध्वस्त केली आहेत. त्याचबरोबर शंभराच्या वर आतंकवाद्याचा खत्म केला आहे भारतीय सैन्यदल हवाई दल व सैन्य दलाने पाकिस्तानवर हल्ले करून पाकिस्तानला धडा शिकवत उत्कृष्ट कामगिरी केली आहे त्याचबरोबर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही योग्य निर्णय घेतला असून पाकिस्तानला घडवलेली अद्दल एकदम योग्य असल्याचे मत व्यक्त करीत आमदार सिद्धार्थ खरात यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी व भारतीय वायुदलाच्या सैन्याचे कौतुक केले आहे.


# शेतकऱ्यांसाठी आंनदाची बातमी..... सन २०२४-२५ खरीप हंगामासाठी ६३५ कोटी ७४ लाखाची नुकसान भरपाई मंजूर

## केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या पाठपुराव्याला यश

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत सन २०२४-२५ खरीप हंगामाकरीता बुलढाणा जिल्हयातील ४७२५८४ शेतकऱ्यांसाठी नव्याने ६३५ कोटी ७४ लाख रुपये मंजूर झाले आहे. केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे शेतकऱ्यांना नुकसान भरपाईच्या रकमेत वाढ झाली असुन ही रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होत आहे.

प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत सन २०२४-२५ या खरीप हंगामा करीता पीक विमा कंपनीने १४४ कोटी रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केले होते. जिल्हयातील अनेक शेतकरी या पीक विम्यापासुन वंचीत राहले होते. पीक विमा कंपनीच्या अधिकाऱ्यांसोबत चर्चा करुन पीक विम्याची रक्कम नुकसानीदाव्यानुसार शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाली पाहीजे. असे निर्देश पीक विमा कंपनीच्या अधिकाऱ्यांना देण्यात आले. त्यामुळे बुलढाणा जिल्हयातील ४७२५८४ शेतकऱ्यांना ६३५ कोटी ७४ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. नुकसान भरपाईची वाढीव रक्कमही शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होत आहे. याशिवाय राज्य शासनाकडे जिल्हयातील १६० दावे प्रलंबित आहेत या संदर्भातही कृषि मंत्र्यांकडे पाठपुरावा करण्यात येत असुन ही प्रकरणेही मंजूर झाल्यानंतर नुकसानीच्या रकमेत वाढ होणार आहे. त्याचा फायदा बुलढाणा जिल्हयातील शेतकऱ्यांना होणार असल्याची माहीती केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या जनसंपर्क कार्यालयातुन देण्यात आली आहे.



## महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा भाकरी फिरणार? शरद पवारांच्या 'त्या' वक्तव्यानंतर पुन्हा राजकीय भूकंपाची शक्यता

**मुंबई/प्रतिनिधी :** गेल्या काही दिवसांपासून ठाकरे बंधू एकत्र येणार अशा चर्चा सुरु आहेत. अशातच आता राष्ट्रवादीत सध्या विलीनीकरणाचे वारे सुरु आहेत का ? असा सवाल सध्या चर्चेत आला आहे. राष्ट्रवादी (एझ) पक्षातील एक गट अजित पवारांसोबत जाणार का अशा चर्चा सुरु झाल्यात. याला निमित्त ठरलंय शरद पवारांनी केलेले मोठं वक्तव्य. इंग्रजी दैनिकाला दिलेल्या मुलाखतीत शरद पवारांनी हे वक्तव्य केले आहे.

आमच्या पक्षातील एका गटाला अजित पवारांसोबत जावं वाटतंय असं वक्तव्य शरद पवारांनी केलंय. एका इंग्रजी दैनिकाला दिलेल्या मुलाखतीत शरद पवारांनी याबाबत माहिती दिलीय. इंडिया आघाडीच्या सद्य स्थितीवरही पवारांनी भाष्य केलंय. तसंच संसदेत विरोधी पक्षात बसायचं की नाही हे सुप्रिया सुळे यांनी ठरवावं असं सूचक वक्तव्य पवारांनी या मुलाखतीत केलंय. पवारांच्या या वक्तव्यांमुळे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये विलीनीकरणाचे वारे सुरु झालेत का अशा चर्चा रंगल्यात.

आमच्या पक्षांतर्गत दोन मतप्रवाह आहेत. एका गटाला वाटतं की आम्ही एकत्र यावं. अजित पवारांसोबत जावं असं एका गटाला वाटतं. एका गटाला वाटतं की भाजपसोबत जाऊ नये. इंडिया आघाडी सध्या सक्रीय नाही. विरोधी पक्षात बसायची की नाहे हे सुप्रिया सुळेंनी ठरवावं, असं शरद पवारांनी म्हटलं आहे.

विधानसभा निवडणुकांच्या निकालानंतर शरद पवाराच्या पक्षात दोन मतप्रवाह निवडून आलेल्या आमदारांमध्ये पाहायला मिळत होते. अनेक आमदारांनी अजित पवारांसोबत जाण्याची इच्छा व्यक्त केली होती. पण यासंदर्भात माध्यमांसमोर कोणीही वक्तव्य केले नव्हते. मात्र आता पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार यांनीच या संदर्भात मोठं भाष्य केले आहे. अजित पवारांसोबत जाण्यासंदर्भात त्यांनी प्रतिक्रिया दिलेली आहे. पक्षातील काही आमदार मतदारसंघातील प्रश्न घेऊन अजित पावरांची भेट घेत असतात. तर काही आमदार प्रसारमाध्यमांवर अजित पवारांवर टीका करताना दिसून येतात. त्यामुळं या चर्चांना पुन्हा एकदा उधाण आलं आहे.

अनेक दिवसांपासून दोन्ही पवार एकत्र येणार का असा सवाल उपस्थित केला जात होता. त्याला कारणही तसंच होतं. अनेक कार्यक्रमात दोन्ही पवार एकत्र आल्याचे पाहायला मिळाले होते. शरद पवार आणि अजित पवार हे वेगवेगळ्या साखर कारखान्यांच्या बैठकांना उपस्थित होते. काही वेळाला त्यांच्यात गुप्त बैठकादेखील झाल्या होत्या. तेव्हा त्यांना हा प्रश्न विचारण्यात देखील आला होता. मात्र आता स्वत: शरद पवारांनीच यावर भाष्य केले आहे. त्यामुळं राजकारणात पुन्हा काही मोठं घडणार का याची शक्यता वर्तवण्यात येतेय. शरद पवार पुन्हा भाकरी फिरवणार का? अशी चर्चा सध्या सुरू आहे.

# जिल्ह्यातील शेतकऱ्यांना ६३५ कोटी रुपयांच्या पीक विमा मंजूर

## भव्य मोर्चा ट्रॅक्टर मोर्चाचे फलित : आमदार सिद्धार्थ खरात यांची माहिती

दैनिक आपला विदर्भ




**मेहकर/प्रतिनिधी :** निवडणूक काळात शेतकऱ्यांना कर्जमाफीचे आश्वासन देऊन सत्ताधाऱ्यांनी सत्ता हस्तगत केली. मात्र, चार महिन्याच्या वर कालावधी होत असताना अद्याप कर्जमाफी न दिल्याने शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या वतीने शेतकऱ्यांना कर्जमाफी द्यावी, पिक विमा मोबादला द्यावा, या मागणीसाठी २ मे रोजी बुलढाणा जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य ट्रॅक्टर मोर्चा काढण्यात आला होता. या मोर्चाने झोपी गेलेले सरकार खडबडून जागे झाले असून या मोर्चामुळे जिल्ह्यातील पावणे पाच लाख शेतकऱ्यांना ६३५ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असून तो वाटपही सुरू झाला आहे. अशी माहिती आमदार सिद्धार्थ खरात यांनी माध्यमांशी बोलताना दिली. यावेळी ते म्हणाले की निवडणूक काळात सत्ताधाऱ्यांनी शेतकऱ्यांना खोटे आमिष दाखवून त्यांची फसवणूक केली आहे. सत्ता हातात येताच आश्वासनाकडे दुर्लक्ष केले आहे. आता शेतकऱ्यांच्या मालाला भाव नाही, निवडणूक काळात भाजप युतीने शेतकऱ्यांना कर्जमाफी देऊ असे आश्वासन दिले. मात्र, सत्ता हस्तगत झाल्यानंतर शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याकडे दुर्लक्ष केले आहे. शेतकरी अनेक समस्यांनी ग्रस्त असताना व शेतकऱ्यांना कर्जमाफीची अत्यंत आवश्यकता असताना शासनाने तत्काळ कर्जमाफी द्यावी, पिक विमा चा मोबदला द्यावा, या मागणीसाठी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या वतीने बुलढाणा जिल्हाधिकारी कार्यालय भव्य मोर्चा काढण्यात आला होता. या मोर्चामुळे झोपी गेलेले महायुतीचे सरकार खडबडून जागे झाले असून शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काचा पिक विमा मोबदला जाहीर केला आहे जिल्ह्यातील पावणे पाच लाख शेतकऱ्यांना ६३५ कोटी रुपयांचा पिक विमा मंजूर झाला असून त्याचे वाटपही सुरू झाले असल्याची माहिती मेहकर -लोणार मतदार संघातील आमदार सिद्धार्थ खरात यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

## मेहकर लोणार मतदार संघातील शेतकऱ्यांना १२८ कोटी रुपयांच्या पिक विम्याचे वाटप सुरू

**मेहकर :** मेहकर लोणार मतदार संघातील शेतकऱ्यांना पीक विम्याचे लाभ मिळणार असून १२८ कोटी रुपयांची रक्कम वाटपासाठी सरकारने जमा केली आहे. या १२८ कोटी रुपयांच्या निधीचे वाटपही सुरू झाली आहे. मेहकर मतदार संघातील जवळपास ५० हजार शेतकऱ्यांना पीक विम्याचा लाभ मिळणार असून त्यांना ९२ कोटी रुपये शासनाने वाटपासाठी संबंधित विभागाकडे वळती केली आहे. तर, लोणार तालुक्यातील तीस हजार शेतकऱ्यांना ३५ कोटी रुपये पिक विम्याच लाभ मिळणार आहे. २ मे रोजी शेतकऱ्यांनी जो भव्य दिव्य मोर्चा काढला त्याचा हा परिपाक असून मी शेतकऱ्यांना विनंती करतो की, शिवसेना व शिवसैनिक हे नेहमीच शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहिलेले आहेत.जो भव्यदिव्य मोर्चा काढला होता. त्याचाही हा परिणाम आहे. भविष्यातही उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे शिवसैनिक शेतकऱ्यांसोबत खंबीर उभे राहतील आणि शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करतील अशी ग्वाही आमदार सिद्धार्थ खरात यांनी माध्यमांची बोलताना दिली.

